Exh. 16

रेग्युलर कज्जा नंबर ५२/२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर, कागल, तालुका कागल,

यांचे कोर्टात-

| | | |
|---|---|---|
| श्री. आनंदा पांडुरंग मांडवकर वगैरे | | वादी |
| वि | | |
| श्री. शिवाजी धोंडी मांडवकर वगैरे | | प्रतिवादी |

मी यांतील वादी नंबर १) श्री. आनंदा पांडुरंग मांडवकर, वय वर्षे ६३, व्यवसाय: शेती व नोकरी रा. कणेरीवाडी, तालुका करविर जिल्हा कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो कीं,

१) यांतील प्रतिवादी नंबर १ व ३ यांनी त्यांची कैफियत याकामी दिलेली आहे. त्या कैफियतीमध्ये नमूद केलेला संपुर्ण मजकूर हा चुकीचा व खोटा असुन, यांतील वादींना कोणत्याही परिस्थितीत मान्य व कबूल नांही.

२) प्रतिवादींनी त्यांचे कैफियमध्ये नमूद केलेला मजकूर हा वस्तुस्थितीनुसार नसुन निव्वळ यांतील वादी हे कामांनिमित्त कणेरीवाडी तालुका करविर येथे रहात असलेचा गैरफायदा घेवून वादींचे दावा मिळकतीमधील सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करित आहेत. त्यामुळेच यांतील वादींनी प्रतिवादींचेविरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

३) प्रतिवादींचे दावेमधील पॅरा नंबर १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४ यामध्ये नमूद केलेला संपुर्ण मजकूर हा चुकीचा व खोटा असुन, यांतील वादींना कोणत्याही परिस्थितीत मान्य व कबूल नांही. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांचे कैफियतीमधील पॅरा नंबर ७ मध्ये नमूद केलेला मजकूर, वादी नंबर २ यांनी कणेरीवाडी, तालुका करविर येथील एकट कुटूंबाच्या उत्पन्नातुन खरेदी घेतलेल्या प्लॉट मिळकती गट नंबर २०१ पैकी ०१.११ आर व गट नंबर ६६ हे. ०१.५० आर या मिळकती वडिलोपार्जित मिळकतीतुन घेतलेल्या असल्या या मिळकती देखिल वडिलोपार्जित मिळकती आहेत. इथंपर्यतंचा संपुर्ण मजकूर हा चुकीचा, खोटा व लबाडीचा असुन, यांतील वादींना

Order Seen C.J.J.D. Dt.13.8.26

3/7/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.08.13 17:47:48 +0530

कोणत्याही परिस्थितीत मान्य व कबूल नांही. कारण सदरहू मिळकती हया वादींनी त्यांचे कमाईतुन खरेदी केलेल्या आहेत. त्या मिळकती वडिलार्जित असले म्हणणेचा यांतील प्रतिवादींना कायदयाने कोणताही हक्क व अधिकार येत नांही. सदरहू मिळकती हया कणेरीवाडी तालुका करविर येथील शिवाजी शंकर मोरे यांचे मालकीच्या होत्या त्या मिळकतीसंर्दभात त्यांनी श्री. आनंदा पांडुरंग मांडवकर यांचे नांवे रजिष्टर दस्त नंबर २२१३ दिनांक २१/०७/२००३ इसवी रोजीच्या रजिष्टर दस्ताने कायम खरेदी दिलेल्या आहेत. त्यासंर्दभात गा. का. तलाठी कणेवाडी यांनी फेरफार नंबर २३५३ चा नोंदवून वादींचे नांव मालकी हक्काने नोंद केलेले आहे. सदरहू मिळकतीमध्ये वादी यांनी त्यांचे स्वकमाईतुन आरसीसी घराचे बांधकाम केलेले असुन, त्यामध्ये वादी हे त्यांचे कुटूंबासमवेत रहात आहेत. प्रतिवादींना सदरहू मिळकतीसंर्दभात कोणत्याही प्रकारचा वाद उत्पन्न करणेचा नैतिक हक्क व अधिकार येत नांही.

४) प्रतिवादींची कैफियमधील पॅरा नंबर ९ मध्ये नमूद केलेला मजकूर पाहिला तर दावा गट नंबर ४१३ मध्ये महाराष्ट्र शासनाकडुन विहिर खुदाईचे अनुदार घेवून बेकायदेशिररित्या विहिर खुदाई करित आहे. म्हणून यांतील वादींनीं मा. गट विकास अधिकारी पंचायत समीती कागल यांचेकडे रितसर तक्रार अर्जही दिलेला आहे. परंतु यांतील प्रतिवादींनी सदरहू गट नंबरमधील विहिर ही स्वखर्चाने खुदाई करित असलेचे नमुद केलेले आहे. ते पुर्णत: चुकीचे असुन त्यासंर्दभात देखिल यांतील वादींनी मा. गट विकास अधिकारी पंचायत समिती कागल यांचेकडे तक्रार अर्ज दिलेला आहे.

५) यांतील प्रतिवादी हे वादींचे दावा मिळकतीमधील सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करित आहेत म्हणून यांतील वादींनी सरसनिरस मानाने तुटक वाटणीचा दावा दाखल केलेला आहे. तो मंजूर करणेत यांवा व यांतील प्रतिवादींनी त्यांची कैफियत दिलेली आहे. ती पुर्णत: चुकीची असुन त्यातील कोणताही मजकूर यांतील वादींना मान्य व कबूल नांही. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुक्काम कागल सही .

कागल.

तारीख ३१/०७/२०२६

31/7/2026

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

प्रतिज्ञा

मी यांतील वादी नंबर १) श्री. आनंदा पांडुरंग मांडवकर, वय वर्षे ६३, व्यवसाय: शेती व नोकरी रा. कणेरीवाडी, सत्य प्रतिज्ञेवर अशी प्रतिज्ञा करतो कीं, वर नमूद ॲफिडेव्हीटमधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम कागल सही तारीख ३१/०७/२०२६

I know the deponent

Adv. M. H. Patil

Solemnly Affirmed before me by
Shri Ananda Pandurang
Age 63 of Kaneriwadi Kolhapur who is
identified by Shri M. H. Patil
Adv whom I know personally
Dated :- 31/7/2026

Assistant Superintendent
Kagal